NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# स्त्रीवाद आणि स्त्रियांसमोरील आजची आव्हाने

**लक्ष्मी धनपाल कोळी**, संशोधक विद्यार्थी , राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

**सारांश –**

पाश्यात्य देशात १८ व्या शतकापासून सुरु झालेली स्त्रीवादाचा अभ्यास १९६० नंतर अधिक सजगपणे मानवतावादी म्हणून स्त्रीवाद चा भान घेऊन नवी विचारप्रणाली अभ्यासास सुरुवात झाली. भारताने ही १९७५ नंतर स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध सुरू झाला. भारतीय स्त्री आजही किती मागासलेला जीवन जगत आहे. हे या निमित्ताने विविध अहवालांद्वारे स्पष्ट झाले. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि छत्रपती शाहू महाराज, आगरकर यांनी स्त्रीयांच्या प्रश्नांसंदर्भात प्रत्यक्ष कार्याची मुहूर्तमेढ रोवली. स्त्रीयांसामोरील आव्हाने सोडवणे महत्वाचे काळाची गरज आहे. स्त्रीयांसमोरील आव्हाने सोडवण्यासाठी शासकीय धोरणे व उपाययोजनांची आवश्यकता आहे आणि त्याद्वारे स्त्रीयांसमोरील आजची आव्हाने सोडवून शकतो. स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार करून स्त्रीयांना समाजात देणे महत्वाचे आहे. माणूस म्हणून स्थान देणे महत्वाचे आहे.

**ठळक शब्द :** स्त्रीवाद, शिक्षण व साक्षरता, आर्थिक स्वायत्तता आणि रोजगार, लैंगिक हिंसा आणि सुरक्षेचा प्रश्न, राजकीय सहभाग आणि नेतृत्व, आरोग्य आणि पोषण

**प्रस्तावना**

स्त्रीवाद हा फक्त एक विचारप्रवाह नसून, तो सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. स्त्रियांच्या अधिकारांसाठीचा संघर्ष हा केवळ आधुनिक काळातील नाही, तर तो अनेक शतकांपासून चालत आलेला आहे. समाजातील रूढी, परंपरा, आणि पितृसत्ताक व्यवस्थेच्या मर्यादांमध्ये राहून स्त्रियांना स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी लढावे लागले आहे. आजच्या काळात स्त्रियांसमोरील आव्हाने अधिक व्यापक आणि गुंतागुंतीची झाली आहेत. आधुनिक स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना यांचा विचार करण्यात येईल.

भारतीय समाज हा विविध संस्कृती, परंपरा आणि सामाजिक संरचना यांचा संगम आहे. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्रियांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. गेल्या काही दशकांत स्त्रियांनी अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली असली, तरी त्यांच्यासमोर अद्यापही अनेक आव्हाने आहेत. यातील काही आव्हाने पारंपरिक सामाजिक संरचना, लिंगभेद, शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय सहभाग आणि तंत्रज्ञानाशी संबंधित आहेत.

राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केला असता, स्त्रियांवरील अन्याय दूर करण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी विविध कायदे, धोरणे आणि योजना राबविण्यात येतात व त्याची काटेकोरपणे अमलबजावणी करणे महत्वाचे आहे.

**उद्दिष्टये :-**

**१) स्त्रीवादाची व्याख्या अभ्यासणे.**

**२) स्त्रीयांसमोरील आजची आव्हाने , उपाययोजना व धोरणाद्वारे सोडवणे.**

**३) स्त्रीयांना माणूस म्हणून स्थान देणे.**

**गृहितके:-**

**१) स्त्रीवादामुळे महिलांना समाजात एक माणूस म्हणून स्थान मिळवण्यास सहाय्य करतात**

**2) स्त्रीयांसमोरील आजची आव्हाने सोडवणे महत्वाचे वाटते.**

**विषय विवेचन : –**

**स्त्रीवाद :-**

**१. स्त्रीवाद शोषणास अनुकूल अशी व्यवस्था समाजात निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या लिंग भेदाच्या विरुध्दची कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद"**

**२. स्त्रीवादी म्हणजे स्त्रीयांना समान हक्क आणि स्थिति देण्यासाठी केली जाणारी हक्क आणि सामाजिक , राजकीय आणि वैचारिक चळवळ होय.**

**स्त्रियांसमोरील प्रमुख आव्हाने :-**

**१) शिक्षणातील असमानता –**

**शिक्षण हाच समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा सर्वात महत्वाचा घटक आहे. भारतात स्त्रीयांच्या साक्षरतेच्या दरात वाढ झाली असली, तरीही ग्रामीण आणि आदिवासी भागांतील स्त्रियांमध्ये शिक्षणाच्या संधी मर्यादित आहेत. बहुतेक मुलींना लग्न, घरकाम, जबाबदाऱ्या यांमुळे शिक्षणात खंड पडत आहे. त्याचबरोबर उच्चशिक्षणात मुलीच्या शिक्षणाची टक्केवारी खूप कमी आहे. ग्रामीण भागात मुलीसाठी स्वतंत्र शाळा किंवा सुरक्षित शिक्षण संस्थांची कमतरता दिसून येते आणि लैंगिक शिक्षणाचा अभाव देखील जाणवतो. भारतातील साक्षरतेचा दर पुरुषांसाठी ९५%, तर महिलांसाठी 70% आहे, ग्रामीण भागात अजूनही 30% मुली माध्यमिक शिक्षणापूर्वीच शाळा सोडतात. काही भागांत मुलीच्या शिक्षणासाठी अद्यापही सामाजिक आणि आर्थिक अडथळे आहेत. त्यामुळे स्त्रीयांची शिक्षणातील दरी दूर करण्यासाठी त्यांना शिक्षण प्रवाहात आणणे हे आपल्यासमोर एक आव्हान आहे.**

**२) आर्थिक स्वायत्ततेचा अभाव –**

स्त्रीयांना अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळत असली, तरी अनेक क्षेत्रांमध्ये त्यांना अद्यापही समान संधी मिळत नाही. उदा. स्त्रियांचे मजुरी प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. महिला उद्योजकतेला आवश्यक वित्त पुरवठा आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव आहे.त्याचबरोबर मातृत्व रजा आणि बाल संगोपणपनाच्या सुविधांचा अभाव आहे. २०२१ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार फक्त २४ % स्त्रीया कार्यरत आहेत. तर पुरुषांची संख्या ही ७५ % आहे. महाराष्ट्रात महिलांचे सरासरी उत्पन्न पुरुषांच्या उत्पन्नाच्या फक्त ६०% इतकाच आहे , महिला बचतगट कार्यरत असले तरी महिला उद्योगांना अद्यापही पुरेसा पाठिंबा नाही. म्हणून त्यासाठी प्रत्येक महिलांनी आर्थिकदृष्या स्वावलंबी होण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ घेतले पाहिजे.

**३) लैंगिक शोषण आणि महिलांवरील हिंसा-**

स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी आणि सायबर गुन्हे हे गंभीर सामाजिक प्रश्न आजही निर्माण होतच आहेत, स्त्रीयांचा कामाच्या ठिकाणी, शिक्षणाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ ,ऑनलाइन ट्रोलिंग आणि ब्लैकमेलिंग प्रमाण वाढत आहे. घरगुती हिंसा व मानसिक छळ हे तर प्रश्न आपल्या आवती भोवती दिसत आहेत.

राष्ट्रीय गुन्हे नोंदवही (NCRB) च्या २०२२ च्या अहवालानुसार भारतात दररोज सुमारे ८८ बलात्काराच्या घटना घटना घडतात. महिलांविरुध्द गुन्हयांचे प्रमाण २० % ने वाढले असल्याची नोंद महाराष्ट्र पोलिसांनी केली आहे. घरगुती हिंसेचे प्रमाण वाढत आहे, विशेषत: ग्रामीण भागात ६५ % पेक्षा जास्त प्रकरणे नोंदली जात नाहीत म्हणून स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी कायदे आणि कायद्याची अमंलबजावणी काटेकोरपणे होणे महत्वाचे आहे.

**४) राजकीय सहभागाचा अभाव –**

स्त्रियांचा राजकीय सहभाग पाहता उच्च पदांवरील नेतृत्व अद्यापही पुरुष करत आहे. उदा. संसद आणि विधान सभांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा कमी आहेत. स्त्री नेत्या विषयी समाजात पूर्वग्रह चुकिचे आहेत. राजकीय पक्षांमध्ये महिलांना दुय्यम स्थान आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढत असला तरी त्यांच्या निर्णयक्षमतेवर पुरुषाचे नियंत्रण आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांचे प्रतिनिधीत्व फक्त १४ % आहे. राजकीय सहभाग वाढवण्यासाठी स्त्रीयांनी निर्भिडपणे नेतृत्व घेवून राजकीयू सहभाग वाढवणे हे महत्वाचे आव्हान आहे.

**५) आरोग्यविषयक समस्या-**

स्त्रियांच्या आरोग्यासंबंधी समस्या प्रामुख्याने त्यांच्या आर्थिक परिस्थिती, शिक्षण आणि सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतात. मातृत्व आरोग्यासाठी असलेल्या योजनांची मर्यादित अंमलबजावणी, मासिक पाळी व्यवस्थापनावरील सामाजिक टाळाटाळ होते, स्त्रीया मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, कुपोषण आणि स्त्रीयांच्या आहाराविषयी असलेले समाजातील चुकीची बंधने पाळली जातात. राष्ट्रीय आरोग्य सर्वेक्षणानुसार (NFHS-5) महिलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण ३६ % आहे . महाराष्ट्रात गर्भधारणा आणि प्रसूतीदरम्यान मृत्यू दर ७० प्रति लाख जन्मांवरून ५५ वर आला असला तरी अजूनही सुधारणा आवश्यक आहे. महिला आरोग्यविषयक योजनांचा लाभ घेणे महत्वाचे आहे.

**महिलांच्या दृष्टिकोनातून उपाय आणि धोरणे**

***१. शिक्षण धोरणे आणि महिला साक्षरता अभियान***

- ‘बेटी बचाव, बेटी पढाव’ योजना
- मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह आणि शिष्यवृत्ती योजना
- ग्रामीण भागात डिजिटल शिक्षणाचा प्रसार

***२. महिलांसाठी विशेष रोजगार आणि उद्योजकता विकास योजना***

- महिला स्वयंरोजगार योजना (Women Self-Employment Scheme)
- प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत महिला उद्योजकांना कर्ज सुलभता
- कर्मचाऱ्यांच्या समान वेतनासाठी कडक नियम

***३. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे आणि पोलीस यंत्रणेत सुधारणा***

- 'निर्भया निधी' अंतर्गत महिला सुरक्षा उपक्रम
- पोलिस दलांमध्ये महिलांचे प्रमाण वाढविणे
- सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर कायदे

***४. महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी उपाय***

- महिलांसाठी ३३% आरक्षण विधिमंडळ आणि संसदेमध्ये लागू करणे
- महिला नेत्यांसाठी नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम

***५. महिला आरोग्यासाठी सरकारच्या योजना***

- जननी सुरक्षा योजना (JSY)
- ग्रामीण भागात मोफत आरोग्य तपासणी केंद्रे
- मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन केंद्रे

**स्त्रीवादाचे भविष्यातील उपाययोजना**

1. **कायदेशीर सुधारणा आणि कडक अंमलबजावणी** – महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.
2. **शिक्षण आणि जनजागृती** – लहानपणापासूनच समानता आणि स्त्री-पुरुष समता यांची शिकवण देणे आवश्यक आहे.
3. **महिलांसाठी सक्षम वातावरण तयार करणे** – कार्यस्थळी आणि समाजात महिलांसाठी सुरक्षित आणि प्रेरणादायी वातावरण असणे गरजेचे आहे.
4. **पुरुषांच्या भूमिकेतील बदल** – पुरुषांनी स्त्रीवादी विचारसरणीचा स्वीकार करून महिलांना समान हक्क आणि संधी मिळवून देण्यास मदत करावी.

**निष्कर्ष**

स्त्रियांसमोरील आव्हाने सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक, आणि राजकीय स्तरांवर मोठ्या प्रमाणात दिसून येतात. कोल्हापूर जिल्ह्यासारख्या प्रगत भागातही या समस्या कायम आहेत. महिलांचे शिक्षण, आर्थिक स्वायत्तता, आणि सुरक्षितता यावर अधिक लक्ष देऊन समाजात परिवर्तन घडवणे आवश्यक आहे. महिलांनी आपले अधिकार ओळखून त्यांचा योग्य वापर करावा, आणि पुरुषांनीही समानतेच्या लढ्यात सहकार्य करावे. स्त्रियांच्या सशक्तीकरणाविना खऱ्या अर्थाने प्रगत समाजाची निर्मिती होऊ शकत नाही.

**संदर्भ सूची**

१. भारतीय राष्ट्रीय महिला आयोग. (२०२२). महिला सुरक्षेसाठी कायदे आणि धोरणे.
२. पाटील, भारती. (२०२०). कोल्हापुरातील ग्रामीण स्त्रिया आणि त्यांचे आरोग्य.
३. नाईक, संजीवनी. (२०२०). भारतीय महिलांचे आर्थिक सबलीकरण. कोल्हापूर: किरण पब्लिकेशन.
४ महाजन वंदना (२०१३), स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन , प्रथम आवृत्ती ,अर्थर्व पब्लिकेशन
५. पाटील, विजया. (२०१२). स्त्रीवादी चळवळी आणि त्यांचे परिणाम. नवी दिल्ली: प्रकाशन विभाग.
६. राष्ट्रीय महिला आयोग (NCW) – www.ncw.nic.in
७. भारत सरकार महिला आणि बाल विकास मंत्रालय – www.wcd.nic.in
८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग – www.maharashtra.gov.in
९. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – www.unishivaji.ac.in